# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि. १६.०६.२०२६ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण व आयुष) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई, यांच्या दालनात सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई
३) सहाय्यक संचालक, लेखा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.
६) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल (निमंत्रित)
७) श्रीमती. वैशाली बापट परिव्यय लेखापाल (निमंत्रित)

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मागील बैठकीत सादर शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन(REVIEW) शुल्क मंजुरीबाबत. | शै.व.२०२५ - २६ च्या २ शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन करण्यासाठी मागील बैठकीस आलेल्या संस्थाप्रमुख (प्रतिनिधिचे) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून घेण्यात आलेला निर्णय खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

**पुनर्विलोकनREVIEW A.Y.२०२५-२६**

**ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम**

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ९०२ | वामनराव इथापे आर जी. एन. एम स्कूल ,संगमनेर, अहमदनगर | GNM | ६६२१६ | ७२८४ | ७३५०० |
| ०२ | २११ | पुना हॉस्पिटल रिसर्च सेंटर, स्कूल ऑफ नर्सिंग, पुणे | GNM | ३१६७४ | ३३२६ | ३५००० |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| २ | शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन ३ (REVIEW) शुल्क मंजुरी चर्चेबाबत. | १. १२९५ साई केअर नर्सिंग स्कूल, ता. शहापूर, जि.ठाणे - Anm,<br>मागील वर्षाचे शुल्क - रु ५००००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ४३०००/-<br>१२९५ साई केअर नर्सिंग स्कूल, ता. शहापूर, जि.ठाणे - GNM<br>मागील वर्षाचे शुल्क - रु ५५०००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ३९०००/-<br><br>सदर संस्थेच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्थेद्वारे अदा केलेल्या वेतनाचे पुरावे जे वारंवार मागणी केल्या नंतरही सादर केलेले नव्हते ते बँक विवरण पत्र व बँकेस सादर केलेली कर्मचाऱ्यांची यादी पुनर्विलोकनासाठी सादर केले .<br>संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे पॅन कार्ड नंबर ही दुसऱ्या संस्थेशी जुळत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रतिनिधिनी सदर कर्मचारी ही केवळ आपल्या संस्थेतच कार्यरत असल्याचे सांगितले. तसेच दिलेल्या कागदपत्रांच्या आधारावर शुल्क वाढ देण्याची विनंती समितीसमोर केली आहे.<br><br>२. १२०९सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट, करवीर, कोल्हापूर- GNM<br>मागील वर्षाचे शुल्क - रु ५७५००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ५००००/-<br><br>सदर संस्थेच्या प्रतिनिधींनी समितीच्या त्रुटींना सादर केलेल्या स्पष्टीकरणाबाबत लेखापाल द्वारे कोणतेही ठोस कागदपत्रे समितीस सादर केलेली नव्हती. बैठकीस उपस्थित प्रतिनिधींनी सदर कागदपत्रे सादर करण्याकरिता २४ तासांचा अवधी मिळावा अशी व या कागदपत्रांच्या आधारावर शुल्क वाढ देण्याची विनंती समितीसमोर केली आहे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार कागदपत्रे सादर करण्याकरिता २४ तासांचा अवधी देण्यात आला.<br>३. <u>९९४ महात्मा फुले नर्सिंग स्कूल, अकोला-GNM</u><br>मागील वर्षाचे शुल्क - रु ६७०००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ३००००/-<br>सदर संस्थेच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्थेने चुकीने Income-Expenditure च्या ऐवजी Receipt-payment च्या रकमेवर प्रस्ताव सादर केलेल्या असून इन्कम मध्ये दर्शविलेले रुपये दोन करोड Income नसून लोन असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच दिलेल्या कागदपत्रांच्या आधारावर शुल्क वाढ देण्याची विनंती समितीसमोर केली आहे.<br>शै.व.२०२५ - २६ च्या ३ शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख प्रतिनिधिचे शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून पुढील बैठकीत निर्णय दिला जाईल , असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | |
| ३. | शै.व. २०२५-२६ च्या Upward Revision प्राप्त झालेल्या संस्थांचे प्रस्ताव शुल्क मंजुरीसाठी सादर. | शै.व. २०२५-२६ Upward Revision प्राप्त झालेल्या संस्थांचे शिक्षण शुल्क प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

<u>Upward Revision A.Y.२०२५ - २६</u>

<u>ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम</u>

| Sr No | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५ - २६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ११२९ | राजमुद्रा एएनएम नर्सिंग स्कूल नांदेड | ANM | ४६१५४ | ४८४६ | ५१००० |

| Sr No | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५ - २६ |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ११२४ | राजमुद्रा जीएनएम नर्सिंग स्कूल नांदेड | GNM | ५१५८३ | ५४१७ | ५७००० |
| ३ | ७६० | राजमाता जिजाऊ नर्सिंग स्कूल, नांदेड | ANM | ६०१८२ | ६३१८ | ६६५०० |
| ४ | ११०० | न्यू राजमाता जिजाऊ आर जीएनएम नर्सिंग स्कूल, नांदेड | GNM | ६०१८० | ६३२० | ६६५०० |
| ५ | ११४६ | साई इन्स्टिट्यूट ऑफ जी.एन.एम. नर्सिंग स्कूल, नांदेड | GNM | ५१५८३ | ५४१७ | ५७००० |
| ६ | ११११ | दगडोजीराव पाटील नर्सिंग स्कूल, जळकोट, लातूर | GNM | ५९७२९ | ६२७१ | ६६००० |
| ७ | १११९ | नंदीग्राम नर्सिंग कॉलेज, नांदेड | GNM | ४९७७४ | ५२२६ | ५५००० |
| ८ | ९८३ | दगडोजीराव पाटील आरजीएनएम नर्सिंग स्कूल हदगाव, नांदेड | GNM | ६४२५३ | ६७४७ | ७१००० |
| ९ | १०१४ | तिरुमला ए.एन.एम. नर्सिंग स्कूल , हदगाव, नांदेड | ANM | ६४२५४ | ६७४६ | ७१००० |
| १० | ३९४ | तिरुमला ए.एन.एम. नर्सिंग स्कूल, जळकोट, लातूर | ANM | ६४२५४ | ६७४६ | ७१००० |
| ११ | ७१८ | रेणुका नर्सिंग आर.ए.एन.एम स्कूल, कळंब, उस्मानाबाद | ANM | ३७१०४ | ३८९६ | ४१००० |
| १२ | ५०१ | चिंगुआई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, कवठे महांकाळ, सांगली | ANM | ४०७२४ | ४२७६ | ४५००० |
| १३ | ५०१ | चिंगुआई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, कवठे महांकाळ, सांगली | GNM | ५५२०४ | ५७९६ | ६१००० |
| १४ | ७०५ | इंदिरा गांधी ए.एन.एम. नर्सिंग स्कूल, परभणी | ANM | ५७२७३ | ५७२७ | ६३००० |
| १५ | ७०५ | इंदिरा गांधी ए.एन.एम. नर्सिंग स्कूल, परभणी | GNM | ४८१८१ | ४८१९ | ५३००० |
| १६ | ८२१ | वर्षाराज नर्सिंग स्कूल, वणी, यवतमाळ | ANM | ४६२७९ | ४७२१ | ५१००० |
| १७ | ८२१ | वर्षाराज नर्सिंग स्कूल, वणी, यवतमाळ | GNM | ४७१८७ | ४८१३ | ५२००० |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ४. | शै.व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क मंजूरीकरीता (Norms) मानकांबाबत चर्चा व निर्णय. | शिक्षण शुल्क समितीच्या सदस्यांनी शै.व. २०२६-२७ च्या मानकांचा अभ्यास करून त्याबाबतचा मसुदा सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजूर मानके शिक्षण शुल्क समितीच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात यावेत.तसेच शै. व. २०२६- २७ च्या शिक्षण शुल्क मंजुरीकरीता ऑनलाइन प्रस्ताव दाखल करण्याबाबतचे परिपत्रक व त्यासंदर्भातील लिंक ४५ दिवसांकरीता चालू करण्याचे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ५. | शै. व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क मंजुरीकरीता संगणक प्रणाली (Software System) कंपनीच्या व software support Engineer (technical person-१) यांच्या नेमणुकीबाबत चर्चा व मंजूरी. | शै. व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क मंजुरीकरीता संगणक प्रणाली (Software System) मंजूरीबाबत व software support Engineer (technical person-१) यांच्या नेमणुकीबाबत दरपत्रके मागवून पुढील बैठकीत चर्चा करून निर्णय घेतला जाईल असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ६. | शै.व. २०२६ - २७ साठी शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीकरीता सनदी लेखापाल फर्म (CA FIRM) यांच्या नियुक्ती बाबत चर्चा. | शै.व. २०२६ - २७ साठी शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीकरीता सनदी लेखापाल फर्म (CA FIRM) यांच्या नियुक्ती बाबत पुढील बैठकीत चर्चा करून निर्णय घेतला जावा असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ७. | शै.व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीच्या बैठकीकरीता निमंत्रित लेखापाल यांच्या नियुक्ती बाबत चर्चा. | शै.व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीच्या बैठकीकरीता निमंत्रित लेखापाल यांच्या नियुक्ती बाबत व त्यांच्या मानधनाबाबत पुढील बैठकीत चर्चा करून निर्णय घेतला जावा असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ८. | शुल्क नियामक प्राधिकरण पत्रावर चर्चा. | शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या प्राप्त पत्रानुसार शिक्षण शुल्क सामितीच्या अधिनस्त संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यादी शुल्क नियामक प्राधिकरण यांना शेअर करण्यास हरकत नाही,परंतु त्याच प्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या अधिनस्त परिचर्या संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यादी शिक्षण शुल्क समितीस शेअर करण्यात यावी व यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात यावा असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा
व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

सहाय्यक संचालक,
लेखा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व आयुष),
तथा अध्यक्ष